# महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये आदेश

जा.क्र.सनिव/नियमन/कलम ८८ आदेश/आंजी विका.सेवा सं./ 565 /२०१७
कार्यालय :- सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था ता. वर्धा.
दिनांक :- 74 | 4 | 2016

वाचा :-
१) या कार्यालयाचा चौकशी अहवाल क्र. सनिव/वि-१/सेवा सह.सं./तक्रार वोंदरे/४५१/२०१६ दि. १८/४/२०१६.
२) या कार्यालयाचे नोटीस क्र. सनिव/वि-१/३७०/२०१७ दि. 31/3/2016

ज्या अर्थी आंजी विशाल विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. आंजी (मोठी) र.नं. २६९ अधिनियम १९६० व त्या खालील नियम १९६१ मधील तरतुदी नुसार नोंदणी झालेली असुन, सदर संस्थेला उक्त कायदा व नियम तसेच संस्थेची उपविधी यातील तरतुदी लागु आहेत.

उपरोक्त वाचा क्र. १ अन्वये सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था ता. वर्धा यांनी आपला चौकशी अहवाल सादर केलेला आहे. आणि वाचा क्र. २ अन्वये अभ्यास दौरा संदर्भात नोटीस बजावण्यात आली आहे. सदर अहवाला नुसार संस्थेमध्ये गैरव्यवहार झाल्याचे दिसुन येत आहे. करिता झालेल्या संस्थेच्या नुकसानीची जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे त्यानुसार खालील मुद्दावर संबंधितांची जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे.

१) माहे जुन २०१५ मध्ये संस्थेच्या कार्यालयाची दुरुस्ती करणेसाठी घेतलेल्या ठरावामध्ये डागडुजी, रंगरंगोटी करणे यात रक्कम मंजुर न करता जुले मध्ये रु ७३६०, माहे ऑगस्ट व सप्टेंबरचे जमा खर्चात रु २४२९०/- असा रु ३१६५०/- खर्च करणे, झालेला खर्च अनियमीतरित्या झाल्याने त्याबाबत संपुर्ण दस्ताऐवज तपासुन जबाबदारी निश्चित करणे.

२) माहे ऑगस्ट मध्ये अध्यक्ष/उपाध्यक्ष दोघांनी मिळुन संस्थेचे रु ४३०००/- चे केलेले बांधकाम, सदर बांधकामाचे एस्टिमेट/ठराव काहीही नसल्याने, योग्य असे मुल्यांकन प्रमाणपत्र नसल्याने याबाबतची जबाबदारी निश्चित करणे.

३) संस्था तोट्यात असतांना, कुठलीही कर्जवसुली सुरु नसतांना, संस्थेच्या संचालकांनी अभ्यास दौऱ्यावर जाणे व त्यासाठीच्या झालेल्या खर्चाची जबाबदारी निश्चित करणे.

वरील प्रमाणे संस्थेचे व्यवस्थापन व आर्थिक व्यवहारासंदर्भातील मुद्यान्वये जबाबदारी निश्चित करुन वसुली करणे आवश्यक असल्या बाबत माझी खात्री झाल्याने पुढील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## //आदेश//

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ आणि महाराष्ट्र शासन, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, मुंबई यांचे शासन निर्णय क्र.सीएसएल १४९३/११६२/सीआर-४७/१५-सो दि. ७ ऑगस्ट १९९३ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार मी ज.मा.तलमले, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था ता. वर्धा या आदेशान्वये आंजी (मोठी) विशाल विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, मर्या. आंजी (मोठी) या संस्थेच्या संदर्भात चौकशी करुन जबाबदारी निश्चित करण्यासाठी व संबंधितांकडुन निश्चित केलेल्या रकमांच्या वसुलीसाठी श्री जयंत मा. तलमले, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता वर्धा यांची नियुक्ती करीत आहे. चौकशी अधिकारी यांनी संबंधित कायदा, नियम, संस्थेचे उपविधी यातील तरतुदी नुसार चौकशी करुन जबाबदार व्यक्तीवर जबाबदारी निश्चित करावी, तसेच सदर जबाबदारी नुसार वसुलीची निश्चिती करण्यात यावी, तसेच कायदेशीर तरतुदी नुसार चौकशी पार पाडुन आपला अहवाल सहा महिण्याच्या आत सादर करावा.

त्याचप्रमाणे चौकशीसाठी लागणारा प्राथमीक खर्च संस्थेकडुन घेण्यात येऊन, तदनंतर एकुण खर्च सर्व जबाबदारी निश्चित करण्यात आलेल्या व्यक्तीवर संयुक्तरित्या आकारण्यात येऊन तसे निश्चित करण्यात यावे.

सदर आदेश माझे सही व शिक्क्यानिशी आज दिनांक १२/५/२०१७ पारीत करण्यात येत आहे.

(ज.मा.तलमले)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था ता.वर्धा.

प्रतिलिपी,

१) मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वर्धा यांना माहितीस्तव सविनय सादर.

२) श्री जयंत मा. तलमले, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. वर्धा. यांना पुढील कार्यवाहीस्तव.

३) अध्यक्ष/सचिव, आंजी (मोठी) विशाल विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, मर्या. आंजी (मोठी) र.नं. २६९ ता.जि.वर्धा यांना पुढील कार्यवाहीस्तव

४) श्री प्रविण गो. शिंदे -------- संचालक/~~अध्यक्ष~~/~~सचिव~~, आंजी (मोठी) विशाल विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, मर्या. आंजी (मोठी) र.नं. २६९ ता.जि.वर्धा

५) आंजी (मोठी) विशाल विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, मर्या. आंजी (मोठी) र.नं. २६९ ता.जि.वर्धा यांना पुढील कार्यवाहीस्तव.

(ज.मा.तलमले)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था ता.वर्धा.